करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com




रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.११० | पाने-१६ | दि.१३/१/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.




# करमाळा तालुक्याचा चेहरा-मोहरा बदलण्याची गरज, त्यासाठी आपण काम करणार - दिग्विजय बागल

करमाळा : करमाळा तालुका, करमाळा शहर व तालुक्यातील विविध संस्था यांची स्थिती अतिशय दयनीय झाली आहे. करमाळा शहर हे मोठ्या ग्रामपंचायती सारखे झाले आहे. संपूर्ण शहर हे धुळीने माखले आहे. अशाचप्रकारे तालुक्यातील विविध मोठ्या गावांची स्थिती ही दयनीय झाली आहे. अशा या गावांचा विशेषत: संपूर्ण तालुक्याचा चेहरा-मोहरा बदलण्याची गरज आहे. ते काम यापुढे आपण करणार आहोत; असे मकाई कारखान्याचे चेअरमन व बागल गटाचे युवा नेते दिग्विजय बागल यांनी सांगितले.

आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने श्री.बागल सा.कमलाभवानी संदेशशी बोलत होते. ते पुढे म्हणाले, की या तालुक्यातील सर्वच राजकीय मंडळी उजनी, दहिगाव उपसासिंचन योजना, कुकडी, वीज आदी बाबीवर बोलतात. ते योग्य आहे, गरजेचे आहे पण त्याबरोबरच करमाळा शहरापासून जेऊर, चिखलठाण, कंदर, केम, जिंती, कोर्टी अशी विविध गावे आहेत की.. त्यांचे वेगळेपण आपण निर्माण करण्याची गरज आहे. सध्याच्या स्थितीत जिल्हा नियोजन मंडळाकडून मिळणारा निधी, ग्रामपंचायतसाठी १५ व्या वित्त आयोगातून मिळणारा निधी, दलित सुधारणा योजनेसाठी मिळणारा निधी हाच फक्त खर्च केल्याचे दाखविले जाते. पण प्रत्यक्षात यापेक्षा वेगळे काम करण्याची गरज आहे. करमाळा शहरातील सर्व रस्ते खराब असून धुळीने माखलेले आहेत. या शहरातील सार्वजनिक उपलब्धतेसाठी एकही केंद्र सुस्थितीत नाही. करमाळ्याचं नाव घ्यावं अशी एकही वास्तू दिसत नाही. खऱ्या अर्थानं करमाळ्याचं नाव वेगळ्या अर्थानं समाजात जाण्यासाठी योग्य नियोजन व ठाम पावलं उचलण्याची गरज आहे. सन २००५ ते २०१० पर्यंत आपण जुन्या पध्दतीनं वागलो ही गोष्ट ठिक आहे; पण आता सन २०२३ मध्येही आपण जुन्याच पध्दतीने चालणार असेलतर ते चुकीचे आहे. आपल्या तालुक्यातील मोठमोठ्या गावांची शक्तीस्थानं ओळखून त्यासाठी योग्य त्या सुविधा, इमारती, रस्ते, वीज आणि पाण्याचे नियोजन केले पाहिजे. याप्रकारे आपण नियोजबध्द काम केल्यास नागरीकांचे जीवन जगणे उत्साही होईलच; पण बाहेरून आलेल्या व्यक्तींनाही करमाळा आणि करमाळा तालुका आवडेल, असेच हे काम होणे गरजेचे आहे. या दृष्टीने आपण निश्चितप्रकारे यापुढे विविध संस्था, सामाजिक कार्यकर्ते, व्यवसायिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींच्या मार्गदर्शनातून हे काम करणार आहे.



करमाळा तालुक्यातील कात्रज भागात आठवड्याच्या शेवटी चार ते पाच हजार लोक पक्षी निरीक्षणासाठी येतात. अशा येणाऱ्या पर्यटकांना कायमचं खिळवून ठेवण्यासाठी योग्य ते पर्यटन स्थळ निर्माण करणे गरजेचे आहे. आपण कुटीर रूग्णालयाचा विचार केला असता, शंभर कॉटचे रूग्णालय असूनही प्राथमिक आरोग्य केंद्राप्रमाणे त्याची स्थिती आहे. हे रूग्णालय अतिदक्षता रूग्णालयाप्रमाणे सर्वसुविधांनियुक्त होईल तेव्हाच त्याचा लाभ नागरीकांना मिळेल. युवकांच्या रोजंदारीसाठी साखर कारखान्यांवर अवलंबून न राहता करमाळा शहराजवळ सव्वाशे एकर क्षेत्र एमआयडीसीसाठी माजी मंत्री दिगंबरराव बागल यांनी संपादीत केले. त्यात नवनवीन उद्योग उभा करून युवकांना समाविष्ट करण्याची गरज आहे. ....दिग्विजय बागल (चेअरमन, मकाई )



## संपादकीय..............................!

# तालुक्यातील शक्तीस्थाने -चिखलठाण

प्रत्येक व्यक्तीचे शक्तीस्थान हे वेगवेगळे असते. काही व्यक्ती बुध्दीमान असतात, काही स्वतःच शक्तीमान असतात, काही धनवान असतात, काही सुंदर असतात, काही साथीदारांचा संच सांभाळून असतात, काही वाडवडीलांचा मोठा वारसा घेऊन येतात, काही घरंदाज शेतकरी असतात,तर काही प्रतिकूल स्थितीत उत्तम शिक्षण घेऊन समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करत असतात, काही धार्मिक आधिष्ठानातून मोठे होतात.अशाप्रकारे प्रत्येक व्यक्तीला काहीना काही शक्तीस्थान मिळालेले असते. ज्यांला स्वतःकडे असलेले शक्तीस्थान समजते व त्यावर संपुर्ण लक्ष केंद्रीत करून कार्यरत रहातो तोच माणूस आपल्या जीवनात प्रगती करू शकतो. जसे व्यक्तीचे शक्तीस्थान असते तसेच शक्तीस्थान काही गावाचे आसते.

आपल्या तालुक्यातही विविध प्रकारची शक्तीस्थाने आहेत. खरंतर गोवा व महाबळेश्वरपेक्षा जास्त विलोभनीय स्थळे आपल्या तालुक्यात आहेत. पण म्हणतात ना जे आपल्याकडे असते त्याचे मुल्य शून्य असते तसेच काहीसे आपले झाले आहे. तालुक्यातील अनेक शक्तीस्थाना पैकी चिखलठाण हे एक विलोभनीय स्थळ आहे. चिखलठाणला कोटलिंग मंदिर आहे.पोमाईचे मंदिर, टोप्यबाबाचे मंदिर अशी काही छोटी मंदिरे आहेत. हे मंदिर भावीकांसाठी मोठे तिर्थक्षेत्र आहे. हे देवस्थान जागृत देवस्थान म्हणून प्रसिध्द आहे. चिखलठाण हे तिर्थक्षेत्र म्हणून महान आहेच पण ते पर्यटनस्थळ म्हणूनही महान आहे. तीन्ही बाजूला पाणी व मध्ये भव्य मंदिर आहे. माकडांची वसाहत त्याबरोबरच त्यांच्या कोल्हांट उड्याही येथे अनुभवास मिळतात. एवढेच नाहीतर या गावात माकडांची शेती आहे. माकडासाठी स्वतंत्र क्षेत्र असून ती पिकवून त्याच्या उत्पन्नातून माकडांची उपजिविका केली जाते. याच शेतीच्या माध्यमातून धान्यबँकही काही काळ चालवली जात होती.

शेजारीच उजनीकाठावर वनराई आहे. त्यावर कावळ्यांचे नगरच वसले आहे. हजारो कावळे स्वतःच्या घरट्यासह येथे वास्तव्य करत आहेत. याबरोबरच चिमण्या,कबुतरे, करकोचा, खंड्या,उन्हाळ्यात येणारे फ्लेमींगो पक्षी व अन्य पक्षी निरीक्षण करणे हा येथील वेगळाच अनुभव आहे. मंदिराशेजारी या परिसरातील सनसेट पाहण्यासारखा असतो. पन्हाळागड व महाबळेश्वर येथल्या सनसेटपेक्षाही हा सनसेट वेगळा असतो. कारण तेथला सुर्य डोंगरात दडतो आणि येथला सुर्य पाण्यात दडतो हे वेगळेपण आहे. मंदिर परिसारत असलेले साधे उद्यान पण ते सुध्दा हवे हवे वाटणारे आहे. उजनी जलाशयातील मासे पकडणे हा काहीजणांचा छंद येथे सहज पुर्ण होवू शकतो, मत्स्यव्यवसाय करणारे लोक वेगळेच पण ज्यांना मासे पकडणे, खेकडे पकडणे आवडते, त्यांना चिखलठाणचा नदी परिसर एक पर्वणी आहे. मंदिराच्या तिन्ही बाजूला पाणी असल्यामुळे हा परिसर अत्यंत विलोभनिय दिसतो. त्या पाण्यात अंघोळ करणे हा एक वेगळाच आनंद आहे पण सर्वात जास्त आनंद येथे पोहण्याचा आहे.स्विमींग टँक पेक्षा हजारपटीने जास्त आनंद देणरे पोहणे येथे ठरते.या परिसरात नौकानयनचा वेगळाच आनंद घेता येवू शकतो. सध्या मत्स्यमारलोकांच्या व्होडीशिवाय अन्य होडी नाहीत ही बाब वेगळी आहे. याच ठिकाणाहून पळसदेव व कळाशी येथे जाणाऱ्या लाँचेस आहेत. या लाँचमधून पर्यटन करणे हा एक वेगळाच अनुभव आहे.

मंदिर परिसरातील शेतीचा हिरवापट्टा हा एक आनंद देणारा निसर्ग आहे. ऊस, मका, केळी व अन्य पीके येथे पाहण्यासारखी आहेत. कृषीपर्यटनाचा आनंदही येथे घेता येवू शकतो. जवळच्या शेतकऱ्याकडील जनावरांचे गोठे, ट्रॅक्टर भ्रमंती,गुऱ्हाळ शेती, पेरूच्या बागा,असे अनेक प्रयोग ठरवलेतर येथे होवू शकतात.

खरंतर चिखलठाण हे राज्यातील पहिल्या क्रमांकाचे प्रेक्षणीय स्थळ होवू शकते पण आपल्या कमकुवत दृष्टीने आपण आजही करंटे राहिलो आहोत. असे म्हणतात की नजर नसलेल्या दृष्टी दान देवू शकतो पण दृष्टी असलेल्या वास्तव दृष्टी देवू शकत नाही. संत तुकाराम महाराज म्हणतात "आंधळ्याशी जण अवघेची आंधळे । आपणासी डोळे दृष्टी नाही ॥" अगदी तसेच आपले झाले आहे. चिखलठाणच्या सौंदर्याकडे आपले अद्याप लक्ष वेधले नाही. जेऊर ते चिखलठाण पर्यंतचा रस्ता वर्षानुवर्षेखराब स्थितीत आहे. याच रस्त्यावर शेटफळ येथील जुने व प्रसिध्द असलेले नागोबाचे मंदिर आहे, पण या दोन्ही गावाला जाणारे रस्ते खराब आहेत. पोफळज ते शेटफळ रस्ता खुपच खराब आहे. जे लोक केत्तूर व परिसरातून पोफळज मार्गे शेटफळ - चिखलठाणला जावू शकतात. सुरवातीला रस्ता परिपुर्ण करण्याची गरज आहे. चिखलठाण येथे मंदिर परिसरात जिल्हा परिषदेचे विश्रामगृह आहे पण त्याचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. मंदिर परिसरात अद्ययावत उद्यान बांधले पाहिजे . नदी परिसरात घाटाची गरज आहे. त्या परिसरातील शनीमंदिर व अन्य छोटी मंदिरे त्यांचे बांधकाम केले पाहिजे. याशिवाय नौकानयन हा स्वतंत्र विभाग निर्माण केला पाहिजे. घोडा गाडी, घोडा रपेट, छोट्या मुलांसाठी रेल्वे, स्विमींगसाठी स्वतंत्र नियोजन, पुरूष विभाग, महिला विभाग निर्माण केले पाहिजे. लाँचसाठी स्वतंत्र स्टेशन त्याभोवती उद्यान, स्वतंत्र बैठक व्यवस्था केली पाहिजे. या परिसरातील शेतकऱ्यांना प्रवृत्त करून कृषी पर्यटनचा स्वतंत्र विभाग सुरू केला पाहिजे. ज्यामध्ये ऊसाचे गुऱ्हाळ, चिंचा पासून बोरे, पेरू, आंबे मिळाले पाहिजे, सेंद्रीय भाजी पाला व सुगीच्या दिवसात हुरडापार्टीची सोय केली पाहिजे म्हणजे एकच ट्रिपमध्ये पर्यटकांना ट्रीप बरोबरच कृषी पर्यटनाचा आनंद मिळाला पाहिजे. येथील शेतकऱ्यांना प्रवृत्त करून या भागात हॉटेल, त्याबरोबरच निवासाची व्यवस्था केली पाहिजे. ज्या ठिकाणी प्रवेशव्दाराची कमान आहे. तिथेच या परिसरात नेमके काय काय आहे, याचा मोठा बोर्ड असला पाहिजे.

एकंदरीत चिखलठाणसाठी निसर्गाने खुप दिले पण त्याचा मेकअप करण्याची गरज आहे. तालुक्यातील लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक प्रशासन व सामाजिक कार्य करणाऱ्यांची ही जबाबदारी आहे. जर स्वप्नातील चिखलठाण अस्तित्वातील आले तर या भागातील लोकांचा रोजगार वाढेल वाहनचालकांना काम मिळेला. हॉटेल, लॉज तसेच शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळेल. असे एक ना अनेक फायदे होणार असून करमाळा तालुक्याच्या वैभवात भर पडणार आहे. त्यामुळे आपण सर्वांनी चिखलठाणच्या वैभवात भर टाकण्या- साठी सज्ज होण्याची गरज आहे.

## मेजर निलंगे यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त विविध कार्यक्रम



करमाळा (सं.प्र.) : शहिद जवान मेजर अमोल अरविंद निलंगे यांच्या सहाव्या पुण्यस्मरणानिमित्त मंगळवारी २४ जानेवारीला सकाळी साडेदहा वाजता साडे येथील स्फुर्तीस्थळ (निलंगे मळा) येथे आदरांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील हे राहणार असून प्रमुख पाहूणे म्हणून ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष अ‍ॅड.डॉ.बाबूराव हिरडे हे राहणार आहेत. यावेळी माजी सैनिक संघटनेचे उपाध्यक्ष अरूणकुमार तळीखेडे, माजी सैनिक सेलचे अध्यक्ष दिपकराजे शिर्के, माजी सैनिक कल्याणकारी सांगोलाचे अध्यक्ष रावसाहेब साळुंके, अहमदनगर जयहिंद सैनिक फाऊंडेशनचे अध्यक्ष शिवाजी पालवे हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी जास्तीत जास्त नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन आजी-माजी सैनिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष आक्रुर शिंदे तसेच मेजर अमोल यांचे पिताश्री अरविंद निलंगे (काका) यांनी केले.

## विलासराव घुमरे यांना संगीत रसिक पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : येथील सुरताल संगीत विद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त संगीत रसिक पुरस्कार विद्या विकास मंडळाचे सचिव व यशवंत परिवाराचे आधारस्तंभ विलासराव घुमरे यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे वितरण अहमदनगर येथील कामगार न्यायाधीश शरद देशपांडे यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सुरताल संगीत विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, प्राचार्य मिलींद फंड, आंतरराष्ट्रीय कलाकार, चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक आदी मान्यवर उपस्थित होते. सुरताल संगीत विद्यालयाचे प्राचार्य नरारे यांनी करमाळा शहर व आजुबाजूच्या गावामधून २५ वर्षामध्ये अनेक कलाकारांना घडवले आहे. या सुरताल संगीत विद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी संगीत रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


कुठल्याही शॉपिंगवर जिंका
रोज २ बनारसी साडी !
नवीन वर्षाची धमाकेदार सुरुवात !
खास मकर संक्रांतीनिमित्त
सादर आहे 'संक्रांत साडी महोत्सव व भरघोस सूट
आणि मिळवा
रोज २ भाग्यवान ग्राहकांना बनारसी साडी !'
भरघोस व्हरायटी मध्ये साड्या उपलब्ध.
संक्रांत साडी महोत्सव
यश कलेक्शन
किमान खरेदी रु.११००/- वर
* महोत्सव कालावधी *
७ जानेवारी ते १५ जानेवारी २०२३ पर्यंत !
बनारसी साडीचा लकी ड्रॉ रोज सायं. ७.३० वा
यश कलेक्शन मध्ये होईल.
YASH COLLECTION
मेनरोड, जय महाराष्ट्र चौक, करमाळा, जि.सोलापूर


AJK Anandi Jewellers
खास मकर संक्रांत निमित्त
असंख्य व्हरायटी मध्ये दागिने उपलब्ध...
आनंदी ज्वेलर्स
मकर संक्रांत स्पेशल... स्क्रॅच कुपन ऑफर
प्रत्येक ३०००/- रुपयाच्या गोल्ड फार्मिंग
ज्वेलरी खरेदीवर एक क्रॅच कुपन मिळवा.
या व्यतिरिक्त प्रत्येक कूपन
वर हमखास एक गिफ्ट
जय महाराष्ट्र चौक, मेनरोड, करमाळा
• फोन (02182)222209. Mo.9420915099

# समृध्द गावासाठी फिसरे ग्रामस्थांनी कसली कंबर

## फिसरे येथे चव्हाण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर



करमाळा(सं.प्र.) : विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १७ ते २३ जानेवारी या कालावधीत फिसरे गावात राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबीरात एक हजार वृक्ष लागवड, ५० शौचालये बांधणे, सेंद्रिय शेती कार्यशाळा, आदर्श सरपंच भास्करराव पेरे-पाटील यांचे मार्गदर्शन, मतदान जनजागृती व नोंदणी, महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम व विधवा महिलांचा सन्मान, जनावरांचे लसीकरण, सांस्कृतिक कार्यक्रमातून प्रबोधन, संपूर्ण गावातील कुटूंबाचा विमा उतरवणे, विविध व्याख्यानातून ग्रामस्थांचे परिवर्तन असे अनेक उपक्रम राबवले जाणार आहेत. या शिबीराची पूर्वतयारी म्हणून फिसरे गावात रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्घाटन ग्रामपंचायत सदस्य प्रशांत नेटके यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच प्रदीप दौंडे हे होते. यावेळी उपसरपंच विजय अवताडे, भरत अवताडे, डॉ.पोपट नेटके, सुभाष नेटके उपस्थित होते.

यावेळी भरत अवताडे यांनी आमच्या विद्यार्थीदशेत जर अशी शिबीरे अनुभवायला मिळाली असती तर आज फिसरे गाव आणखी जास्त विकसित झाले असते; अशी खंत व्यक्त केली. डॉ.पोपट नेटके व डमाले सर यांनी शिबीरासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख यांनी १७ जानेवारीला होणाऱ्या शिबीराची रूपरेषा स्पष्ट केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी उपसरपंच संदीप नेटके यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा.एम.डी.जाधव यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.बी.एच.मस्कर यांनी मानले. यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, प्रतिष्ठीत मंडळी, ग्रामस्थ व जि.प.शाळेचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, विद्यार्थी व स्वयंसेवक उपस्थित होते.


# भावपूर्ण आदरांजली !

तुका म्हणे जालें सायासासें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ॥



स्व.कोंडीबा नागनाथ घोलप(गुरूजी)

कष्टाने केली आयुष्याची सुरूवात
सगळ्यांवर फिरविला मायेचा हात
सुख जवळ येताच काळाने फिरवली पाठ
जन्मोजन्मी पाहू आम्ही तुमची वाट..!

**स्व.कोंडीबा नागनाथ घोलप(गुरूजी)** यांचे प्रथम वर्षश्राध्द मंगळवार दि.१७/१/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. श्रध्दांजली व सकाळी १० वा. ह.भ.प.राजेंद्र महाराज किंभवणे नान्नजकर यांचे किर्तन होईल.

**आपले नम्र**

**गं.भा.रूक्मिणी कोंडीबा घोलप**

**डॉ.अविनाश कोंडीबा घोलप** **श्री.अक्षय भारत घोलप**

**समस्त घोलप परिवार, करमाळा.**

**स्थळ : घोलप हॉस्पीटलच्या पाठीमागे, घोलपनगर, करमाळा.**



# ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL

AlIOPATHY AYURVED HOMEOPATHY

**डॉ.रोहन रामदास कुंभार**
B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ

**डॉ.मनोज रामदास कुंभार**
M.D. कन्सलटींग फिजीशीयन

**डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार**
B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट

✻ वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ ✻
✻ २४ तास अत्यावश्यक सेवा ✻

**डॉ.सौ.सायली मनोज कुंभार**
M.sc. Biotech, Health & Nutrition आहारतज्ञ

**ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी** शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार ● हृदयरोग व उच्च रक्तदाब ● मधुमेह ● थायरॉईड ● संधिवात ● पोटाचे आजार ● स्त्रियांचे आजार ● श्वसनसंस्थेचे आजार ● मणक्यांचे व हाडांचे विकार ● मुतखडा ● मुळव्याध ● सौंदर्य समस्या ● त्वचारोग व केशविकार ● आहारविषयक मार्गदर्शन..

उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)

**पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. ● संपर्क : मो.9960334005, 9423333950**


# श्रीदेवीचामाळ येथे चार कोटीच्या विकासकामांचा शुभारंभ



करमाळा(सं.प्र.) : तीर्थक्षेत्र विकास आराखडा योजने अंतर्गत श्रीदेवीचामाळ येथील श्री कमलाभवानी मंदिर परिसरातील चार कोटीच्या विकासकामांचा शुभारंभ माजी आमदार जयवंतराव जगताप व आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी सरपंच महेश सोरटे, उपसरपंच दिपक थोरबोले, दादासाहेब पुजारी, नवनाथ सोरटे, सतीश थोरबोले, तुषार जगताप, राजेंद्र सुर्यपुजारी, सचिन चोरमले, तुकाराम सोरटे, सचिन चव्हाण, श्रीराम फलफले, पै.अनिल पवार, राजेंद्र पवार, ग्रा.पं.सदस्य संतोष पवार, सचिन शिंदे, अमोल चव्हाण तसेच डेप्युटी इंजि. उबाळे, कन्हेरे रावसाहेब, प्रमोद गायकवाड, प्रसाद भोसले, बाबा ढेपे, योगेश सोरटे, पै.सूरज पवार, अक्षय थोरबोले, अमीर शेख, सुशांत पवार, प्रकाश काशवीद, बापू पवार, भैय्या सुरवसे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत ओम खाडे जिल्ह्यात प्रथम



करमाळा(सं.प्र.) : जुलै २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इ.५ वी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खडकेवाडी शाळेतील विद्यार्थी ओम राजकुमार खाडे याने २९८ पैकी २७८ गुण मिळवून गुणवत्ता यादीत सोलापूर जिल्ह्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. या विद्यार्थ्यास वर्गशिक्षिका वनिता बडे (खाडे) यांचे मार्गदर्शन लाभले. ओमच्या उज्वल यशाबद्दल प्राथमिकचे शिक्षणाधिकारी संजय जावीर, गटविकास अधिकारी मनोज राऊत, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी जयवंत नलवडे, केंद्रप्रमुख महादेव यादव, देवळालीचे सरपंच गहिणीनाथ गणेशकर, उपसरपंच अश्विनीताई शिंदे, सर्व ग्रा.पं.सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा तृप्ती शेळके, उपाध्यक्षा राधा जाधव, खडकेवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता भस्मै, शाम माने, शकुर शेख यांनी अभिनंदन केले.


# प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

**पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.**
**मो.9423222266, 9604762600**

**डॉ.डी.बी.केमकर**
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

**उपलब्ध सुविधा...**
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
- जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार ● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय

**वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)**

**अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER)** रविवारी बंद

**सिध्दीविनायक ऑप्टीकल्स्** आमच्याकडे नंबरचे चष्मे व गॉगल्स योग्य दरात मिळतील.
बॅंक ऑफ इंडिया शेजारी, बसस्टॅन्ड समोर, करमाळा. प्रोप्रा : वर्षा गायकवाड मो.९५२७२६८१८१/७७५६८२५८२६

स्व.कल्याणराव गायकवाड यांचे चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त

# देवळाली येथे ॲम्ब्युलन्स लोकार्पण सोहळा व रक्तदान शिबीर संपन्न





करमाळा(सं.प्र.) : पंचायत समितीचे माजी उपसभापती कल्याणराव गायकवाड यांच्या स्मरणार्थ ९ जानेवारी रोजी देवळाली येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्व.कल्याणराव गायकवाड यांचे चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त ॲम्ब्युलन्स लोकार्पण सोहळा आ.संजय. शिंदे यांचे हस्ते करण्यात आला. तसेच सकाळी दहा वाजता भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ११७ जणांनी रक्तदान केले. शिबीराचे उद्घाटन पोलीस उपअधिक्षक डॉ.विशाल हिरे व पोलीस निरीक्षक ज्योतिराम गुंजवटे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी रक्तदात्यांना २० लिटर पिण्याच्या पाण्याचा जार भेट देण्यात आला. पुण्यतिथी निमित्त सकाळी ह.भ.प.अविनाश भारती महाराज यांचे सुश्राव्य किर्तन झाले. यावेळी देवळाली व परिसरातील हजारोच्या संख्येने नागरीक उपस्थित होते. किर्तनानंतर जेवण देण्यात आले. यावेळी देवळाली व परिसरातील रूग्णांसाठी स्व.कल्याणभाऊ गायकवाड यांचे स्मरणार्थ अम्ब्युलन्स लोकर्पण करण्यात आले. यावेळी आ.संजय शिंदे यांचेसह आदिनाथचे माजी अध्यक्ष वामनराव बदे, महाराष्ट्र केसरी चंद्रहास निमगिरे, विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, टायगर ग्रुपचे अध्यक्ष तानाजी जाधव, पंचायत समिती सदस्य ॲड.राहूल सावंत, सरपंच तानाजी झोळ, उद्योजक भरत आवताडे, गणेश करे-पाटील, सुजित बागल, सरपंच गहिणीनाथ गणेशकर, उपसरपंच धनंजय शिंदे, सदस्य पोपट बोराडे, प्रकाश कानगुडे, रामभाऊ रायकर, रामा कानगुडे, बापू गुंड, अक्षय गायकवाड, संदीप गायकवाड, माजी सरपंच संतोष गायकवाड, दिपक ढेरे, अतुल वाघमारे, अर्जुन जगताप, सुनील आवटे, राजू घळके, मानसिंग खंडागळे आदी उपस्थित होते. बाळासाहेबांची शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांनीही रक्तदान शिबीरास भेट दिली.

### सवलतीच्या दरात रूग्णवाहिका मिळणार



तालुक्यात रूग्णवाहिकेची गरज असून आम्ही स्व.कल्याणभाऊ गायकवाड यांचे स्मरणार्थ रूग्णवाहिकेचा निर्णय घेतला आहे. अनेक रूग्णवाहिका चालक जादा दराने पैसे घेऊन आडवणूक करतात. रूग्णांची ही आडवणूक थांबविण्यासाठी आम्ही ५० टक्के खर्चात व सवलतीच्या दरात ही ॲम्ब्युलन्सची सेवा रूग्णांना देणार आहोत. एकादा रूग्ण गरीब कुटूंबातील असेल व त्याच्याकडे पैसे नसतील तर त्या कुटूंबास मोफत रूग्णवाहिका देण्याची तयारी आम्ही केली आहे. जास्तीत जास्त रूग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा.

**आशिष गायकवाड (माजी सरपंच)**
**मो.९६८९७८२५२५**

वीट येथे पाणीपुरवठा योजनेसाठी

# १ कोटी २१ लाख ७६ हजार निधी मंजूर

करमाळा(सं.प्र.) : आमदार संजयमामा शिंदे यांच्या सहकार्यातून जलजीवन मिशन योजने अंतर्गत वीट येथे पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी १ कोटी २९ लाख ७६ हजार ५७७ रू. निधी मंजूर झाला आहे; अशी माहिती सरपंच वंदना ढेरे यांनी दिली. वीट गावाला उन्हाळ्यामध्ये तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत होते. ग्रामस्थांची ही निकड लक्षात घेऊन आमदार शिंदे यांच्याकडे आम्ही पाणीपुरवठा योजना विषयी मागणी केली. त्यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद देऊन वीट गावासाठी १ कोटी २९ लाख रुपये असा भरीव निधी मंजूर केल्यामुळे वीट गावचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी मिटेल; अशी आशा आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून दलित वस्तीमध्ये बौध्द विहार बांधण्यासाठी नऊ लाख रूपयाचा निधी आमदार संजयमामा शिंदे यांचे सूचनेनुसार मंजूर झालेला आहे. त्यामुळे आ.शिंदे यांचे वीट ग्रामस्थ कायम ऋणी आहेत; असेही सरपंच वंदना ढेरे यांनी सांगितले.

सा.संदेशच्या दि.६/१/२०२३ च्या अंकात स्व.कल्याण(भाऊ) गायकवाड यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाच्या जाहिरातीत मा.श्री.संजयमामा शिंदे (माजी आमदार) असे छापण्यात आले आहे. तरी याबाबत दिलगीरी व्यक्त करून सदर ठिकाणी मा.श्री.संजयमामा शिंदे (आमदार) असे वाचावे..!
...व्यवस्थापक, सा.क.भ.संदेश


सर्व सोयीसुविधायुक्त ५४० स्के.फूटचा
हॉल भाड्याने देणे आहे
रिटेल, ऑफिस, शैक्षणिक संस्था
किंवा शिकवणीसाठी हॉल
सुविधा........................................
● प्रकाशमय व हवेशीर हॉल ● शांत वातावरण
● शौचालय व बाथरूमची सोय ● प्रशस्त बाल्कनी
संपर्क : मो.९४०४३८९२७६, ९४२३७९०६१३
पत्ता : महेंद्रनगर, सागर टॉकीजच्या मागे, करमाळा.

UAIMS
अत्याधुनिक उपचारांसाठी आता
पुण्या मुंबईला धावाधाव कशाला ?
कारण येणार आहेत उषःकाल अभिनवचे डॉक्टर तुमच्या भेटीला!
उषःकाल अभिनवच्या डॉक्टरांची
कोग्रेकर हॉस्पिटल, करमाळा येथे ओपीडी भेट.
स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ
डॉ. संजय कोग्रेकर
डॉ. स्वाती कोग्रेकर
Consultant Gynaecologist
बालरोग तज्ज्ञ
डॉ. विनया सारंगकर
Consultant Pediatrician
हृदयरोग तज्ज्ञ
डॉ. राहुल महाडिक
Consultant Interventional Cardiologist
हृदय शस्त्रक्रिया
डॉ. अमोल भोजे
Consultant Cardiothoracic & Vascular Surgeon
सांधे प्रत्यारोपण
डॉ. समीर शेख | डॉ. रवींद्र भरमगुंडे
Consultant Orthopedic Surgeon
रजिस्ट्रेशन फी ₹200
वार व तारीख : रविवार, 29 जानेवारी 2023 | ओपीडीची वेळ : स. 10 ते सायं. 4
पत्ता: कोग्रेकर हॉस्पिटल,
भवानी नाका, जेऊर रोड, करमाळा
- संपर्क -
थोरात सिस्टर : 996-090-6407



भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष व
श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक/अध्यक्ष
मा.श्री.गणेश(भाऊ) चिवटे
यांची सोलापूर जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य
पदी निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
संचेती परिवार, करमाळा.


मेहनत केल्यानंतर
सफलता मिळते
सफलता मिळाल्यानंतर
आनंद मिळतो
मेहनत तर सगळेच करतात,
पण सफलता तर त्यांनाच मिळते
जे कठोर मेहनत करतात...!
C.A.
परीक्षेत यश संपादन
केल्याबद्दल
अंकिता
मंडलेचा-जैन
हिचे
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
घरच्या सीए ची वाट पाहणारं मंडळ


दिवस आज खास.., तुम्हाला उदंड आयुष्य लाभो हाच मनी ध्यास !
मा.श्री. पारेवाडी येथील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक
परबत सखाराम जाधव
यांना ८५ व्या वाढदिवसानिमित्त
॥ हार्दिक शुभेच्छा ॥
शुभेच्छुक
मुलगा - नानासाहेब जाधव
जावई - चांगदेव घोगरे, दादासाहेब मोहिते, विजयकुमार काळे, वसंत घोगरे
पत्नी - सौ.धनश्री जाधव, मुली - सौ.अनिता, सौ.सुवर्णा, सौ.कल्पना, सौ.वैशाला
सुन - सौ.तेजस्वीता, सर्व नातू, नाती व जाधव परिवार

## सुरतालच्या रौप्य महोत्सवानिमित्त
# करमाळेकरांना दिली संगीत व नृत्याची पर्वणी




करमाळा(सं.प्र.) : सुरताल संगीत विद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय सुरताल संगीत नृत्य महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. दिल्ली, आसाम, गुवाहटी, ओडिसा राज्यातून आलेल्या कलाकारांनी आपल्या कलेतून रसिकांची मने जिंकली.

करमाळा येथील सुरताल संगीत विद्यालयाच्या रजत जयंती कार्यक्रमानिमित्त या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिल्ली येथील डॉ.आम्रपाली त्रिवेदी, डॉ.मनीषा देवी गोस्वामी: गुवाहटी (आसाम) भरतनाट्यम्, गुरू स्वप्नाली गोस्वामी : गुवाहटी(आसाम) सत्रिय नृत्य, डॉ.पंकज नामसूद्रा : गुवाहटी (आसाम) सत्रिय नृत्य, ज्योतिर्मयी मोहंती : भुवनेश्वर (ओडिसा) ओडिसी नृत्य इ. विविध राज्यातील नामवंत कलाकारांनी आपली कला सादर केली. या कलाकारांना संस्थेच्या वतीने 'सुर सरस्वती' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर पाच विद्यालयाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनीही आपले गायन-वादन सादरीकरण केले.

या कार्यक्रमादरम्यान सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्याबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील यांना विद्यालयाच्या वतीने संगीत रसिक हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते अंक प्रकाशनही करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून अहमदनगर कामगार न्यायालयाचे न्यायाधीश शरद देशपांडे, ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष अॅड.डॉ.बाबूराव हिरडे, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मिलींद फंड, सामाजिक कार्यकर्ते श्रेणिक खाटेर, मकाईचे माजी संचालक विवेक येवले, राष्ट्रवादी सेलचे अशपाक जमादार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना विलासराव घुमरे यांनी सुरताल संगीत विद्यालयास भविष्यात सर्वतोपरी मदत केली जाईल. यावेळी गणेश करे-पाटील म्हणाले, की नरारे सरांनी सुरताल संगीत विद्यालयाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडविण्याचे काम अगदी मनापासून केले आहे. या सेवेच्या माध्यमातून अनेक कलाकार तयार होत आहेत. देश-विदेशातूनही कलाकार येऊन करमाळा सारख्या ग्रामीण भागामध्ये आपली कला सादर करतात त्यामुळे करमाळ्याचे नाव देशातच नव्हेतर बाहेर देशात सुध्दा पोहोचविण्याचे काम नरारे सरांनी केलेले आहे. त्यामुळे सुरताल विद्यालयासाठी आपण तन-मन-धनाने सर्वतोपरी सहकार्य करणार आहे. प्रास्ताविक प्राचार्य बाळासाहेब नरारे, सुत्रसंचालन रेश्मा जाधव, सायली पद्माळे, सारिका विटूकडे यांनी केले आभार स्वराली जाधव यांनी मानले.

# भारत शिक्षण मंडळाच्या स्नेहसंमेलनात गुणवंतांचा गौरव




करमाळा(सं.प्र.) : भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक संकुलाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वासराव देवकाते यांचे हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात आंतरशालेय क्रिडा स्पर्धेतील विजेत्या संघांना तसेच सन २०२२ मध्ये दहावी, बारावी परीक्षेत विशेष गुण प्राप्त करून यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नारायण पाटील, अनिल गुंजाळ, डॉ.सुभाष सुराणा, डॉ.शारदा सुराणा, उपाध्यक्ष अनिलकुमार गादीया, संचालक विलास पाथुडकर, पृथ्वीराज पाटील, संजय दोशी, विवेक दोशी, सुनील बादल, सरपंच भारत साळवे, उपसरपंच अंगद गोडसे, प्रा.हनुमंत धालगडे, ठोकळ, मुंबई महापौर केसरी विजय गुटाळ, दिलीप देवकाते, शेरखान नदाफ, रविंद्र देवकाते, डॉ.रितेश निर्मळ, आबासाहेब गोडसे, उमेश कांडेकर, प्राचार्य डॉ.अनिल शिंगाडे, केशव दहिभाते, हनुमंत रूपनर आदी मान्यवर उपस्थित होते. अहवाल वाचन सचिव प्रा.अर्जुनराव सरक यांनी केले. सुत्रसंचालन अंगद पठाडे यांनी केले. उपस्थितांचे आभार दिपक व्यवहारे यांनी मानले.

# राजुरी येथील सुकन्या प्रकाश लोखंडे सीए परीक्षा उत्तीर्ण



करमाळा(सं.प्र.) : राजुरी येथील सुकन्या प्रकाश लोखंडे हिने देशातील अत्यंत प्रतिष्ठीत परीक्षापैकी एक असलेल्या सीए च्या परीक्षेत यश संपादन केले असून त्यामध्ये ती उत्तीर्ण झाली आहे. सुकन्या ही राजुरी येथील रहिवासी प्रकाश लोखंडे यांची कन्या आहे तर लालासाहेब लोखंडे यांची पुतणी आहे. तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण फातिमा हायस्कूल बदलापूर (जि.ठाणे) येथे इंग्रजी माध्यमातून झाले तर महाविद्यालयीन शिक्षण मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स (मुंबई) येथे झाले आहे. तिचे वडील नोकरीनिमित्त बदलापूर येथे स्थायिक आहेत. करमाळा तालुक्यामधून मुलीमध्ये सीए होण्याचा मान तिला मिळाला आहे. प्रतिकुल परिस्थितीतून अभ्यासाबरोबरच समाजकार्य करत तिने हे यश संपादन केले आहे.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष संस्कार शिबीर अंतर्गत
# प्रतापसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय तर्फे साडे येथे मशाल फेरी



करमाळा (सं.प्र.) : प्रतापसिंह मोहिते-पाटील महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष संस्कार शिबीर ५ जानेवारी पासून सुरू झाले आहे. त्याद्वारे ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, अंधश्रध्दा निर्मुलन, महिला सक्षमीकरण यासारखे उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये संस्थेच्या चेअरपर्सन पद्मजादेवी मोहिते-पाटील व कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून व पाणी फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने मशाल फेरीचे आयोजन केले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी सेंद्रिय शेती, गटशेती व विषमुक्त शेती संदभार्त ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली. पाणी फाऊंडेशनचे प्रतिक गुरव, आशिष लाड, प्रणय तसेच साडे येथील मयुर पाटील, दत्तात्रय जाधव, कालिदास ढवळे, रेगुडे, आडेकर सर महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.सोमनाथ जाधव, प्रा.अमोल गायकवाड, प्रभारी प्राचार्य डॉ.देशमुख उपस्थित होते.

# पांगरे नळ पाणीपुरवठा योजनेसाठी १ कोटी १० लाख मंजूर

करमाळा (सं.प्र.) : पांगरे येथील नवीन नळपाणीपुरवठा योजनेसाठी जलजीवन योजनेतून आमदार संजयमामा शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली तब्बल १ कोटी १० लाख ६० हजार रूपये मंजूर झाले आहेत; अशी माहिती उपसरपंच राणी विवेक पाटील यांनी दिली.

पांगरे गावामध्ये पाच वर्षात आ.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सोयीसुविधा निर्माण केलेल्या असून, कोट्यावधी रूपयांची विकासकामे करून गाव सुजलाम सुफलाम केलेले आहे. पाच वर्षाच्या कालावधीत गावाचे रूप सुंदर केलेले असून तसेच चालू वर्षी आमदार फंडातून श्री भैरवनाथ मंदिर भक्त निवाससाठी पाच लाख रूपये, तुळजाभवानी मंदिर सभामंडपासाठी सात लाख रूपये एवढा निधी मंजूर केला आहे. जलजीवन योजनेच्या माध्यमातून पांगरे गावाची नवीन पाणीपुरवठा योजना गावात आणि वाड्यावस्तीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प या योजनेतून सार्थकी ठरला जाईल; असेही उपसरपंच राणी पाटील यांनी सांगितले.

प्रवेश! महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित सरकारमान्य प्रवेश!!
अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट
इंग्रजी : (३०-४०) मराठी : (३०-४०) हिंदी : (३०-४०)
टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरू आहे
किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५

इथं सौंदर्य जन्म घेतं..
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
मकरसंक्रांतीनिमित्त साड्यांचा भरपूर स्टॉक व भरपूर व्हरायटीमध्ये उपलब्ध !
घरगुती विक्रीसाठी साड्या होलसेल दरात मिळतील
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
अॅड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186


# प्रथम पुण्यस्मरण



शून्या मधुनी विश्व निर्मुनी,
कीर्ती सुगंध वृक्ष फुलवूनी,
माया, प्रीती, संस्कार देवूनी,
सत्य-सचोटी मार्ग दावूनी,
अमर झाला तुम्ही जीवनी !

## भावपूर्ण आदरांजली !

आमचे येथे आमचे वडील

**कै.केशव(बापू) गणपतराव वीर**

यांचे प्रथम पुण्यस्मरण मित्ती पौष वद्य ॥६॥ शके १९४४ शुक्रवार, दि.१३/१/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. करण्याचे योजिले आहे. त्यानिमित्त **ह.भ.प.अभयकुमार रमाकांत शहाणे महाराज** व त्यांचे सहकारी भजनी मंडळ यांचे सुश्राव्य हरिकिर्तन सकाळी १० ते १२ यावेळेत होणार असून त्यानंतर पुष्पांजली व महाप्रसाद होईल. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**आपले नम्र**

**श्रीमती हिराबाई केशवराव वीर (पत्नी), श्री.प्रदीप(दादा) केशवराव वीर (मुलगा), श्री.प्रवीण(भाऊ) केशवराव वीर (मुलगा) सौ.प्रतिभा रमेशराव सुरवसे (मुलगी), सौ.प्रचिती विनायकराव टकले (मुलगी)व समस्त वीर परिवार, करमाळा.**

**स्थळ : बहुउद्देशीय हॉल, श्री महादेव मंदिर समोर, किल्ला वेस, करमाळा.**

# एस.एस.के.एस. असोसिएट्स्

## अकौंट मॅनेजर पाहिजेत

सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)

**पदासाठी अटी खालीलप्रमाणे..**

- **कामाची वेळ :** सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
- **पात्रता :** कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- **पगार :** ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

**संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)**

**पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टासमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.**

टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.

उपसरपंच



सरपंच



रजनी महावीर जगदाळे

तरटगाव वि.का.सोसायटीचे विद्यमान चेअरमन

**श्री.अभिजीत प्रदीप जाधव-पाटील**

यांची तरटगाव ग्रा.पं.च्या उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल

**हार्दिक अभिनंदन !**

शुभेच्छुक

**चौधरी परिवार** करमाळा

# भावपूर्ण श्रध्दांजली



स्व.सौ.मनिषा दिलीप पिसाळ
(मृत्यू दि.५/१/२०२३)

संधिप्रकाश रेंगाळत असतो
त्याप्रमाणे तुमचा सहवास संपला तरीही..
तुमच्या आठवणींचा सुगंध दरवळत असतो..!

**स्व.सौ.मनिषा दिलीप पिसाळ**

यांचे दु:खद निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच भावपूर्ण श्रध्दांजली !

**दशक्रिया विधी**

शनिवार, दि.१४/१/२०२३ रोजी
श्री कोटलिंग मंदिर, चिखलठाण, ता.करमाळा येथे होणार आहे.

**शोकाकुल : समस्त पिसाळ परिवार, दहिगाव**


सोलापूर जिल्हा
नियोजन समितीच्या
सदस्य पदी माजी आमदार
मा.श्री.नारायण(आबा) पाटील
व भारतीय जनता पार्टीचे
तालुका अध्यक्ष
मा.श्री.गणेश(भाऊ) चिवटे
यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
आनंदी लॉन्स & मंगल कार्यालय
पोथरे, ता.करमाळा.
प्रोप्रा : बाळासाहेब होसिंग (ता.अध्यक्ष, भाजपा उद्योजक आघाडी)
श्री.बाळासाहेब होसिंग


नशिबावर अवलंबून राहू नका...!
मकरसंक्रांतीनिमित्त
माऊली ज्वेलर्स
प्रस्तुत करीत आहे..
श्रीउ ज्वेलरी
(गोल्ड फार्मिंग ज्वेलरी)
SCRATCH & WIN
स्क्रॅच करा..
व लगेच आपले
बक्षिस घेवून जा
Scheme-2023
प्रत्येक ३००० रू. च्या गोल्ड फार्मिंग ज्वेलरी खरेदीवर एक कूपण
प्रथम बक्षीस
TVS Scooty
१५ नग
द्वितीय बक्षीस
32" LED TV
३० नग
तृतीय बक्षीस
Sewing Machine
४५ नग
या व्यतिरिक्त प्रत्येक कूपन वर एक बक्षीस
एकूण बक्षीस मुल्य रू.२,६१,००,०००
(दोन कोटी एकसष्ट लाख रू.)
• स्किम कालावधी : दि.१/१/२०२३ ते १/१/२०२४
हॉलमार्क प्रमाणित दागिणे मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण !
माऊली
प्रोप्रा : जाधव बंधू
मो.9860987074, 9960455007
दत्तपेठ, करमाळा


॥ द्वितीय पुण्यस्मरण ॥
स्व.जयकुमार रावजी व्होरा
(द्वितीय पुण्यस्मरण - दि.१२/१/२०२३)
सरले वरीस आठवण होते तुमची क्षणाक्षणाला ।
अशी दिव्यमूर्ती आता शोधावी कोणत्या वनावनाला ॥
माणुसकीचा बाज वाटे तुमचा आम्हा मनामनाला ।
दादा.. वंदन करतो आम्ही तुम्हाला द्वितीय पुण्यस्मरण दिनाला ॥
करमाळा शहरातील प्रसिध्द आडत व्यापारी
स्व.जयकुमार रावजी व्होरा
यांच्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !
शोकाकुल
भीमराव लोंढे व परिवार
अतुल शेळके व परिवार
रविराज हुंदाडे व परिवार


हार्दिक अभिनंदन
ऑरिस्टो किडस् मार्फत घेण्यात आलेल्या
राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस परीक्षेत
करमाळा येथील मुथा अबॅकस अॅकडमी
मधील विद्यार्थी
चि.सार्थक मकरंद वनारसे
याने 4th level मध्ये द्वितीय क्रमांक
मिळवून दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय
स्तरावर निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !
• मार्गदर्शिका : ज्योती मुथा, पल्लवी भिंगारे
शुभेच्छुक
वनारसे परिवार, करमाळा.

# करमाळा शहरात देशभक्त कै.नामदेवरावजी जगताप यांची जयंती उत्साहात साजरी





करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात स्वातंत्र्य सैनिक देशभक्त कै.नामदेवरावजी जगताप यांची १०३ वी जयंती उत्साहात व विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात आली.

जयंतीनिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आमदार संजयमामा शिंदे व माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे हस्ते कै.नामदेवराव जगताप यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी बोलताना आ.शिंदे म्हणाले, की उजनी धरणाच्या उभारणीत कै.नामदेवराव जगताप यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या दूरदर्शीपणामुळेच आज सोलापूर जिल्ह्यात तब्बल ४० साखर कारकाने कार्यरत आहे. शैक्षणिक व सहकार क्षेत्रात त्यांचे कार्य अविस्मरणीय असून संपूर्ण जिल्हा त्यांचा ऋणी आहे. यावेळी युवा नेते शंभुराजे जगताप, सामाजिक कार्यकर्ते श्रेणिक खाटेर, वाशिंबेचे सरपंच तानाजी झोळ, रावगावचे सरपंच दादासाहेब जाधव, पं.स.चे माजी सदस्य तात्यासाहेब शिंदे, सुजित बागल, शहाजी शिंगटे, प्रभाकर शिंदे, राजेंद्र चिवटे, परेश दोशी, विक्रांत मंडलेचा, मिलींद दोशी, मनोज पितळे, अमृत परदेशी, ॲड.नवनाथ राखुंडे, जिल्हा बँकेचे निरीक्षक अभयसिंह आवटे, बाजार समितीचे सचिव विठ्ठल क्षीरसागर यांचेसह शेतकरी व व्यापारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युसूफ शेख यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा.दत्तात्रय भागडे यांनी केले उपस्थितांचे आभार गटसचिव बबन मेहेर यांनी मानले.

नामरत्न कॉम्प्लेक्स येथे कै.नामदेवराव जगताप यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन जयंत देवकर सर यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी देवकर सर म्हणाले, की स्वातंत्र्यपूर्व काळापासून कै.नामदेवराव जगताप यांचे खूप मोठे योगदान लाभले आहे. आपल्या हयातीमध्ये अनेक जणांचे संसार उभे करण्याचे काम साहेबांनी केले. तालुक्यामध्ये शिक्षण संस्था, उजनी धरण, प्रशस्त एस.टी.आगार, उपजिल्हा रुग्णालय, मांगी तलाव इ. विकासकामे साहेबांनी केली. यावेळी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रताप जगताप, बाजार समितीचे उपसभापती चिंतामणी जगताप, माजी नगरसेवक राहूल जगताप, संभाजी शिंदे, जैनुद्दीन शेख, गफूरभाई शेख, दस्तगीर पठाण, जावेदभाई शेख, महिबूब शेख, सुजय जगताप, प्रतिक जगताप, अतुल मारकड, गणेश फलफले, गितेश लोकरे, बबलू चिंचकर, उत्तरेश्वर सावंत, किरण साळुंखे, राजेंद्र कुंभार, सागर परदेशी, राजू तांबोळी, आदिनाथ खुटाळे, सोनू परदेशी, कटारिया आदी उपस्थित होते.

महात्मा गांधी विद्यालय येथे स्वातंत्र्य सैनिक व देशभक्त कै.नामदेवरावजी जगताप यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य पोपट कापले यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य ए.एच. बागवान, पर्यवेक्षक एस.टी.शिंदे, बी.के.पाटील, प्रा.व्ही.एल. पवार यांचेसह महात्मा गांधी माध्यमिक, उच्च माध्यमिक व तांत्रिक प्रशाला मधील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## जय महाराष्ट्र पतसंस्थेच्या चेअरमन पदी तांबोळी यांची तर व्हा.चेअरमन पदी इंदुरे




करमाळा(सं.प्र.) : जय महाराष्ट्र पतसंस्थेच्या चेअरमन पदी माजी नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी यांची तर व्हा.चेअरमन पदी बाळासाहेब इंदुरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. सहाय्यक निबंधक दिलीप तिजोरे यांच्या उपस्थितीत ही निवड पार पडली.

जय महाराष्ट्र नागरी सहकारी पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणूक होऊन सर्व संचालक बिनविरोध निवडून आले आहेत. अध्यक्ष पदासाठी तांबोळी व व्हा.चेअरमन पदी साठी इंदुरे यांचेच अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. यावेळी संस्थेचे संचालक मनोज पवार, पांडूरंग जाधव, शिरीष थोरबोले, तरूण पटेल, नैनिष कटारिया, श्रावण इंगोले, सुनितताई बनसुडे, आशादेवी पाटणे यांच्यासह व्यवस्थापिका करूणा पवार, कॅशियर राठोड मॅडम, हेडक्लार्क नम्रता मेहता, पिग्मी एजंट शक्ती मणेरी, प्रभावती दिक्षित, लक्ष्मी हुंडाडे, राहूल किरवे, सौरभ आवटे, वसुली अधिकारी सुधीर कटारिया आदी उपस्थित होते. यावेळी सहाय्यक निबंधक दिलीप तिजोरे यांनी नवनियुक्त अध्यक्ष उपाध्यक्ष व संचालक मंडळास शुभेच्छा देऊन सत्कार केला व पतसंस्थेचा कारभार पारदर्शी करून कर्जदार व सभासदांना चांगली सेवा देण्याचे आवाहन केले.

यावेळी पतसंस्थेचे चेअरमन अल्ताफशेठ तांबोळी यांनी पुन्हा अध्यक्ष पदाची संधी दिल्याबद्दल सर्व सभासदांचे व संचालकांचे आभार व्यक्त केले. उपस्थितांचे आभार उपाध्यक्ष बाळासाहेब इंदुरे यांनी मानले. यावेळी नूतन संचालकांचा सत्कार करण्यात आला.



जय महाराष्ट्र नागरी सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये सर्व संचालक बिनविरोध निवडून देण्याची परंपरा सभासदांनी कायम राखली आहे. सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाच्या बळावर यापुढे देखील पतसंस्थेचे कामकाज प्रामाणिकपणे व सचोटीने केले जाईल. सभासद व कर्जदारांना योग्य न्याय देऊन जास्तीत जास्त चांगली सेवा देण्याचा प्रयत्न केला जाईल. **...प्रविण कटारिया (संस्थापक/सचिव)**


## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात कै.नामदेवराव जगताप यांची जयंती साजरी



करमाळा(सं.प्र.) : विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महाविद्यालयाचे संस्थापक, देशभक्त कै.नामदेवराव जगताप यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांचे हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी तत्पर राहिले पाहिजे व विद्यार्थ्यांचा, महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे; असे मत घुमरे सर यांनी व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, माजी प्राचार्य नागेश माने, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, कनिष्ठ व वरीष्ठ विभागाचे सर्व प्राध्यापक, कर्मचारी वृंद उपस्थित होते.

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी १५० रू. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा..!

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर


रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२


स्थापना १९९६ रजि.नं.एस.यु.आर./के.एल.ए./(आर)/ १००४/९६ दि.१५/०२/१९९६
आईच्या मायेने कर्ज देणारी व बापाच्या धाकाने वसुल करणारी सर्व सामान्यांची पतसंस्था
जय महाराष्ट्र ना.सह.पतसंस्थेच्या चेअरमन पदी
मा.श्री. हाजी अल्ताफ हाजी हशमोद्दीन तांबोळी
व्हा. चेअरमन पदी
मा.श्री. बाळासाहेब गंगाधर इंदूरे
व सर्व नवनिर्वाचित संचालकांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल
संस्थापक
चेअरमन
व्हा.चेअरमन
हार्दिक अभिनंदन...
२८ व्या वर्षात पदार्पन
नुतन संचालक
श्री.मनोज पवार
श्री.पांडुरंग जाधव
श्री.शिरीष थोरबोले
श्री.तरुण पटेल
श्री.नैनिश कटारिया
श्री.श्रावण इंगोले
सौ.सुनिता बनसुडे
सौ.आशादेवी पाटणे
व्यवस्थापक
कॅशिअर
क्लार्क
पिग्मी एजंट
करुणा पवार
रेखा राठोड
नम्रता मेहता
शरफुद्दिन मणेरी
प्रभावती दिक्षीत
लक्ष्मी हुंदाडे
राहुल किरवे
सौरभ आवटे
* संस्थेची वैशिष्ट्ये *
* संस्थेच्या मालकीची इमारत
* तत्पर कर्ज पुरवठा
* सोने तारण कर्ज
* विनम्र व तत्पर सेवा
* ग्राहक हेच आमचे दैवत
* अल्पमुदत व सभासद कर्ज
फोन :- ०२१८२ - २२००००
ठेवीवर आकर्षक व्याजदर
स्थापना : १९८८
* शुभेच्छुक *
रजि. नं. एफ ४५७६
जय महाराष्ट्र मित्र मंडळ
जय महाराष्ट्र चौक, मारवाडी गल्ली, करमाळा

# सालकरी गडी झाला वायरमन - आता लवकरच होणार उद्योजक !

करमाळा(सं.प्र.) : प्रगती करणाऱ्याला आकाशसुध्दा ठेंगणं पडतं. काम न करणाऱ्यांना घराच आंगणसुध्दा मोठं वाटतं. कामाची दिशा ठरली आणि सोबत मेहनत असली की, कठीणातील कठीण कामही सहज होते. अगदी तसंच झालंय.. पोथरे येथील वायरमन नवनाथ उर्फ पप्पू नंदरगे यांचं !

पप्पू नंदरगे यांचा वाडवडिलार्जित लोहारकीचा व्यवसाय. वडील तुळशीराम नंदरगे यांनी संपूर्ण आयुष्यभर करमाळा शहरात जाऊन सुतारकाम केले. आई हिराबाई घरातील काम करत शेतात काम करत होत्या. भाऊ नागा हा स्वत:च्याच विचारात कायम गुंगून गेलेला होता. बहिण विजया बापूराव वाघमारे ही पारनेर येथे आपल्या संसारात गुंतून पडलेली आहे.

थोडक्यात पप्पूच्या लहानपणा-पासूनच घरात अलबेल नव्हते. दररोज खाण्याचा प्रश्न पडलेला होता. त्यामुळे पप्पूला सातवीच्या पुढे शिकणे अशक्य होते. त्यामुळे पप्पू यांनी सातवी झाली की बाबूराव वाळुंजकर यांचे शेतात तब्बल दहा वर्षे मजूर म्हणून काम केले. १९९८ पर्यंत मजुरी केल्यानंतर पप्पू यांनी वायरमन होण्याचे स्वप्न पाहिले. पण ना जादा शिक्षण- ना आयटीआय. ना ट्रेनिंग - ना वशिला. पण पप्पू आपल्या स्वप्नावर ठाम होता. इकडे-तिकडे काम करत त्यास लातूर



भागात नवीन लाईन ओढण्याचे काम सुरू असल्याचे समजले. त्यानंतर ना कोणाची ओळख ना कोणाचा संपर्क तरीही हातात गाडीखर्चीचे पैसे घेऊन पप्पूने लातूर भागातील बाभूळगाव गाठले. ठेकेदाराला विनवणी करून लेबर म्हणून २०० रू. रोजाचे काम मिळवले आणि तेथूनच वायरमनचा प्रवास सुरू झाला.

खरंतर कोणत्याही क्षेत्रात शिकावं म्हणून कोणी शिकवत नसते. केवळ लेबर म्हणून काम करूनही कोणी शिकत नसतो. पप्पू संबंधित ठेकेदाराला एवढी मदत करत असे की, ठेकेदार स्वत:च जोखमीची कामे सांगू लागला. जिथे आडेल तिथे समजून सांगू लागला. पहाता पहाता तीन वर्षात पप्पू वायरमन म्हणून प्रॅक्टीकली फिट झाला पण हातात डिग्री नव्हती.

सन २०१६ ला पप्पूने वीज वितरण कंपनीचे ठेकेदार अमोल महाडिक यांचेकडे काम सुरू केले. लेबर भरणे व पोल रोवणे, तारा ओढणे, डी.पी.बसवणे अशी कामे सुरू केली. पप्पूचे सतत काम आणि परिपूर्ण काम ही बाब त्यावेळचे उपअभियंता प्रविण राऊत यांचे निदर्शनास आले. त्यांनी पप्पूला कंत्राटी वायरमन म्हणून मांगी व पोथरे येथे काम सुरू केले.

पोथरे येथे काम करताना गावातून नेहमीच हेळसांड झाली. पण पप्पूने त्याचा कधी विचार केला नाही. काम सुरूच ठेवले. या कामा बरोबरच पत्नी शुभांगी हिच्या सहकार्याने गावात शेती वाट्याने करण्याचे काम सुरू केले. वाट्याच्या शेतीत ऊस पिकवला आहे. आज पप्पूकडे साडेसहा एकर जाणारा ऊस असून नवीन ११ एकर ऊसाची लागवड आहे. नोकरीला पर्याय निर्माण केला. कोणतेही व्यसन नाही. जोडीला कल्पकदृष्टी, रात्रंदिवस मेहनत करण्याची तयारी यातूनच पप्पू यांनी आपली प्रगती केली आहे. हा प्रवास येथेच थांबत नाहीतर यापुढे पप्पू यांचा वेगळा प्रवास आहे. पोथरे गावाच्या बसस्थानकाजवळ पाच गुंठे जागा घेतली असून तेथे एक नवा उद्योग उभारण्यासाठी पप्पू नंदरगे यांचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्या वाटचालीसाठी खूप-खूप शुभेच्छा !

***

## जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत वीटच्या मुलींचा संघ प्रथम

करमाळा(सं.प्र.) : जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत जिल्हा परिषद केंद्र शाळा वीट शाळेच्या मुलीच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या संघाने दक्षिण सोलापूरच्या संघावर रोमहर्षक विजय संपादन केला. खो-खो स्पर्धेत वीटच्या मुलीच्या संघाने तीन संघाला पराभूत करनू अतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम स्पर्धेत दोन गुणांनी वीटच्या संघाने दक्षिण सोलापूर संघावर विजय मिळवला व तालुक्याला व वीट गावाला एक नंबरचे प्रथम पारितोषिक मिळवून दिले. या संघामध्ये सृष्टी जगदाळे, अमृता ढेरे, आसावरी जाधव, प्रतिक्षा कांबळे, आर्या काळे, प्राची मारकड, शुभ्रा ढेरे, सौंदर्य ढेरे, अमृता भिसले, अन्वी जाधव, श्रेया ढेरे व प्रितम इरले या मुली सहभागी होत्या. दोन महिने कसून सराव करून हा संघ शिक्षक चंद्रहास चोरमले (केंद्रप्रमुख) यांनी यावर्षी तयार केला. अथक मेहनत घेतली व पहिल्याच प्रयत्नामध्ये यश प्राप्त केले. या संघाला तयार करण्यासाठी गोरख ढेरे सर, बरडे सर, जाधव सर, विनोद ढेरे सर व सर्व शिक्षक छत्रपती शिवाजी विद्यालय वीट व भाऊसाहेब गायकवाड यांचे सहकार्य लाभले. विजयी संघाची शनिवारी ७ जानेवारीला सकाळी नऊ वाजता वीट गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.






## राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस परीक्षेत
# मुथा अकॅडमीची गरूड भरारी - यशाची उज्वल परंपरा !




करमाळा (सं.प्र.) : पुणे येथे ८ जानेवारी रोजी अरिस्टो किडस् आयोजित राष्ट्रीय स्तरावर अबॅकस व वैदिक मॅथस् ३परीक्षेत करमाळा येथील मुथा अबॅकस अकॅडमी मधील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.या परीक्षेसाठी विविध राज्य व जिल्ह्यातून १८०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये मुथा अबॅकस अकॅडमी मधील ६० विद्यार्थी सहभागी झाले होते. यामधील ४२ विद्यार्थ्यांची दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना दहा मिनीटात ७५ गणित अचुक सोडविणे अनिवार्य होते. यामध्ये मुथा अबॅकस मधील विद्यार्थ्यांनी चार ते पाच मिनीटातच अचुक उत्तर देऊन यश प्राप्त केले. या सर्व विद्यार्थ्यांना सीए अशोकजी पगारिया, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे गणेश करे-पाटील, पिंपरी-चिंचवड दै.सकाळचे सह संपादक जयंत जाधव, सामाजिक कार्यकर्त्या आदिती निकम, मॅनेजींग डायरेक्टर उज्वल पांडा आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते अकॅडमीच्या सर्व मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.**यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे....** ● **वैदिक मॅथस्** - सुजल यादव ● **अबॅकस(तिसरी/चौथी लेव्हल)** - सार्थक वनारसे, आदित्य कापसे, स्वराज विटूकडे, आदित्य सोनी, सानिका पंडित, अर्थव कुलकर्णी ● **अबॅकस (सेकंड लेव्हल)** - समीक्षा थोरे, काव्या शेलार, स्पंदन घरबुडे, सई पडवळे, विराज निरवणे, गौरव विटूकडे, सिध्दी गुळवे, विरश्री भोसले, सक्षमी दोशी, रिया शहा ● **अबॅकस (फर्स्ट लेव्हल)** - सिध्देश यादव, अन्योक्ती जाधव, सुयश चौधरी, दिव्यांका बागल ● **अबॅकस (झिरो लेव्हल)** - गौरी राणे, विराज करळे, प्रणित शिंदे, श्रावणी गवळी, श्रावणी बागडे, शौर्य देवकर, तनिश तळेकर, तेजस्वीनी देवकर, स्वप्नील कुदळे, रिध्देश परदेशी, शौर्य माने, करण करळे, स्नेहांश खटावकर, स्वप्नील कुदळे, प्रांजल कांबळे, जयदेव भिंगारे, प्रतिज्ञा परिहार. यश शहा ● **सहभागी विद्यार्थी** - आर्यन कापसे, आदिराज ममदापुरे, समर्थ ननवरे, ओम ठोंबरे, हर्षल वाघमोडे, राजवीर शिंदे, राजवीर मल्होत्रा, शंभुराजे शिंदे, श्रेयश पवार, श्रृती विटूकडे, श्रेयश नवले, सोहम मुथा, युवराज वासानी, आरोही खळदकर, अथर्व शहा, ऋषीकेश शहा, पृथ्वीराज परदेशी, अपूर्वा पाटकुले तहा जनवाडकर. विद्यार्थ्यांना मुथा अकॅडमीच्या ज्योती मुथा व पल्लवी भिंगारे यांचे मार्गदर्शन लाभले.

# कोंढेजचे सरपंच गणेश सव्वाशे यांचा संभाजी ब्रिगेड कार्यालयात सत्कार

करमाळा(सं.प्र.) : संभाजी ब्रिगेडचे जिल्हा सचिव गणेश सव्वाशे यांची कोंढेज ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार संभाजी ब्रिगेड कार्यालय करमाळा येथे करण्यात आला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष शंकर पोळ शहराध्यक्ष वैभव माने, दत्ता फंड, अशोक अडसुळ, आदित्य जाधव, महेश यादव, दत्ता आरणे, बालाजी बोराडे, प्रशांत शिंदे आदी उपस्थित होते.




# हार्दिक अभिनंदन !



जयदेव जगदीश भिंगारे

ॲरिस्टो किडस् मार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस परीक्षेत करमाळा येथील मुथा अबॅकस अकॅडमी मधील विद्यार्थी
**चि.जयदेव जगदीश भिंगारे** याने
**0 level** मध्ये जिल्हास्तरीय **Fourth Rank** मिळवून दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

**शुभेच्छुक**

**✻ ज्ञानप्रभु अबॅकस वैदिक मॅथस् क्लासेस (८००७५७८२६)**
**✻ मुथा अबॅकस अकॅडमी (९७३०५०५१५३)**


| जाने ऑक्टो | मे | ऑगस्ट | फेब्रु मार्च नोव्हे | जुन | सप्टें डिसें | एप्रिल जुलै | २०२३ चे संक्षिप्त कॅलेंडर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरू | शुक्र | शनि | १ | ८ | १५ | २२ | २९ |
| सोम | मंगळ | बुध | गुरू | शुक्र | शनि | रवि | २ | ९ | १६ | २३ | ३० |
| मंगळ | बुध | गुरू | शुक्र | शनि | रवि | सोम | ३ | १० | १७ | २४ | ३१ |
| बुध | गुरू | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | ४ | ११ | १८ | २५ | |
| गुरू | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | ५ | १२ | १९ | २६ | |
| शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरू | ६ | १३ | २० | २७ | |
| शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरू | शुक्र | ७ | १४ | २१ | २८ | |

संपूर्ण वर्षाचे कॅलेंडर संक्षिप्त स्वरूपात पहाता येईल, लक्षात पण ठेवता येते. दरवर्षी पुढील महिन्याचे वार सारखेच असतात (१) जानेवारी व ऑक्टोबर (२) मे (३) ऑगस्ट (४) फेब्रुवारी, मार्च, नोव्हेंबर (५) जून (६) सप्टेंबर, डिसेंबर (७), एप्रिल, जुलै या महिन्याचे वार सारखेच असतात. प्रत्येक १, ८, १५, २२, २९ तारखेस १ तारखेस असणारा वारच असतो, समजा २४ तारखेचा वार पहावयाचा/तोंडी आठवायचा आहे तर त्या महिन्याच्या १ तारखेला असणारा वारच २२ तारखेला असतो व त्याचे पुढचे दोन वार मोजले की २४ तारखेचा वार येतो. म्हणजे प्रत्येक महिन्याची १ तारखेस असणारा वार वरील कॅलेंडरप्रमाणे लक्षात ठेवल्यास संपूर्ण वर्षाचे कॅलेंडर तोंडी सुध्दा (तारीख व वार) लक्षात ठेवता येते.

**राजकुमार रूपचंद राठोड**
**आर राठोड ज्वेलर्स, जेऊर, ता.करमाळा.**
**मो.८७८८८६०८५८/९४२३५२६४९५**


खुशखबर..! खुशखबर...!! खुशखबर...!!!

**airtel**
**MNP धमाका ऑफर**

JIO, Vi, BSNL चे कोणतेही सिमकार्ड घेऊन या आणि Airtel मध्ये पोर्ट करून घ्या अगदी मोफत व मिळवा

**Rs.299 चा रिचार्ज अगदी फ्री !**

**सोबत मिळवा....**

- अनलिमिटेड कॉल रोज 1.5 GB DATA
- रोज 100 SMS (२८ दिवस)
- सोबत एक भेटवस्तू फ्री



**ऑफर कालावधी : रविवार, दि.१५/१/२०२३ पर्यंत**

पत्ता
**फ्रेंडस् मोबाईल शॉपी**
एअरटेल ऑफिस, मारूती मंदिर जवळ, किल्लावेस, करमाळा.
**संपर्क : प्रफुल शिंदे (9823162510)**


रेडि पझेशन मध्ये
बुकिंग सुरु
श्री डेव्हलपर्स
- उपलब्ध सुविधा -
• अण्णासाहेब विद्यालय ५ मी.अंतरावर •
• नवीन भाजी मंडई १० मी.अंतरावर •
• 2BHK रो- बंगलोज • डबल मास्टर बेडरुम •
• स्वतंत्र प्रशस्त पार्किंग • स्वतंत्र काँक्रिट जिने •
• इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग पॉइंट •
• वास्तुशास्त्राप्रमाणे बांधकाम •
• आर. सी. सी. इमारत •
• सर्व ब्रॅन्डेड अमेनिटीज्सह दर्जेदार बांधकाम •
• स्वतंत्र व प्रशस्त पार्कींग व २४ तास पाणी
• कंन्सील्ड ईलेक्ट्रीक फिटींग •
• डबलचार्ज टाईल्स व ग्रेनाईट •
• लाफ्ट इन किचन अ‍ॅण्ड बेडरुम •
• पावडर कोटेड अ‍ॅल्युमिनीयम ३ ट्रॅक स्लाईडिंग विंडो •
बँक लोन सुविधा उपलब्ध
HOME LOAN
* त्वरित संपर्क करा : 8459392545
पत्ता - प्लॉट नं. २०, अण्णासाहेब विद्यालय शेजारी,(बालाजी नगर)
कै.बाजीराव जाधव नगर, करमाळा जि. सोलापूर


12 जानेवारी
श्री मकाई सह.साखर कारखान्याचे चेअरमन व युवा नेते
मा.श्री.दिग्विजय(प्रिन्स) बागल
यांना वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा
जिगरबाज युवा नेता
शुभेच्छुक
• शामलताई बागल महिला दूध संस्था • किर्तेश्वर कृषी उद्योग समूह
• शिव-प्रताप प्रतिष्ठान सेवाभावी संस्था • विराज अर्थमुव्हर्स
केतूर नं.२, ता.करमाळा, जि.सोलापूर
श्री.अमोल खाटमोडे-पाटील

# पाणी सोडण्याच्या कारणावरून शिपायास मारहाण

करमाळा(सं.प्र.) : ग्रामस्थांना पाणी सोडू नको असे म्हणालो असताना तू पाणी का सोडले असे म्हणून तिघा जणांनी पोमलवाडीचे ग्रा.पं.शिपाई हरिदास भानुदास बाबर यांना दगडाने व हाताने मारहाण केली आहे. हा प्रकार ६ जानेवारीला सायंकाळी साडेपाच वाजता पोमलवाडी येथे घडला आहे. या प्रकरणी हरिदास बाबर यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी ६ जानेवारीला सकाळी उपसरपंच पदाची निवड झाल्यानंतर माझ्या मोटारसायकलवरून येऊन गावातील पाणी चालू केले. तेथे दत्तात्रय आनंदराव पाटील हे आले व तू फिल्टरचे पाणी व साधे पाणी सोडायचे नाही असे म्हणालो असताही तू पाणी का सोडले म्हणून शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर मी त्यांना समजावून सांगून घरी गेलो. सायंकाळी साडेपाच वाजता बजरंग पाटील, हरी पाटील व दत्तात्रय पाटील (सर्व रा.पोमलवाडी) हे माझ्या घरी आले व तू सांगितलेले का ऐकत नाही म्हणून काठीने व दगडाने मारहाण करून मला गंभीर जखमी केले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल श्रीकांत हराळे हे करत आहेत.

# पाईपलाईनचे काम करताना दोन गटात हाणामारी

करमाळा(सं.प्र.) : आवाटी येथे फुटलेल्या पाईपलाईनचे काम करत असताना आजिनाथ उर्फ पिंटू नलवडे यांनी दोघा जणांना दगडाने व गजाने मारहाण केली आहे. हा प्रकार ६ जानेवारीला सायंकाळी चार वाजता घडला आहे. यात राजू उस्मान खान (रा.आवाटी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की गावातील रस्त्याचे काम चालू असताना आमच्या पाईपलाईनचे पाईप फुटले होते. त्यामुळे चारी खोदून फुटलेले पाईप लाईनचे काम माझा चुलतभाऊ आझम बाबू खान हा करत असताना आजिनाथ नलवडे आला व त्याने येथे पडलेला दगड उचलून माझ्या चुलत भावाच्या मानेवर मारला. मी त्यास विरोध केला असता, त्याने तेथेच पडलेला गज उचलून माझ्या डाव्या हातावर मारून जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

याच घटनेत आजिनाथ नलवडे यांनी आझम बाळू खान, फकिर अहमद खान, राजू उस्मान खान व अमीर उर्फ कलंदर फकीर खान (सर्व रा.आवाटी) यांचे विरूध्द फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की पाईप लाईनच्या चारीचे काम आमच्या घराच्या जवळून घेऊ नका; असे म्हणाल्यावरून या चौघांनी काठीने मला बेदम मारून मारहाण करून जखमी केले आहे. याचाही तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

# पावणेसोळा वर्षाच्या मुलीचे अपहरण - पोलीसात गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : येथील एका माध्यमिक शाळेत दहावीच्या वर्गात येत असलेली मुलगी परंतू अलिकडे ती शाळेत येत नव्हती. अशी पावणेसोळा वर्षाची शेलगाव(वीर) येथील मुलगी ६ जानेवारीला सकाळी साडेअकरा वाजता बोअरचे बटन बंद करण्यास जाते म्हणून गेली ती पुन्हा आलीच नाही. या प्रकरणी वडीलांनी तिचे अपहरण झाल्याबाबतचा संशय व्यक्त करून गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पो.उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

# शेतात काम करणाऱ्या महिलेला जातीवाचक शिवीगाळ

करमाळा (सं.प्र.) : शेतात काम करणाऱ्या महिलेस जातीवाचक शिवीगाळ प्रकरणी एकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार ९ जानेवारीला सायंकाळी चार वाजता बोरगाव येथे घडला आहे. या प्रकरणी ४५ वर्षाच्या महिलेने गावातील अशोक सर्जेराव शिंदे याच्याविरूध्द फिर्याद दिली असून त्याने कारण नसताना जातीवाचक शिवीगाळ करून वाद घातल्याचे म्हटले आहे. पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस उपअधिक्षक विशाल हिरे हे करत आहेत.

# चोरीची वाळू पकडली - ५ लाख २५ हजाराचा ऐवज जप्त

करमाळा(सं.प्र.) : कर्जतकडून करमाळ्याकडे जाणाऱ्या ट्रक मधून चोरीची वाळू जात असताना पोलीसांनी पकडली आहे. हा प्रकार ७ जानेवारीला पहाटे साडेपाच वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अमोल बापूराव जगताप यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की कर्जतकडून एक सहाचाकी ट्रक मधून चोरीची वाळू येत असल्याची माहिती समजली होती. त्यानुसार आम्ही पोलीस कर्मचारी व पंच लिंबेवाडी फाट्याजवळ थांबलो असता सहाचाकी ट्रक क्र.एमएच १४ बीजे २९०७ हा भरधाव वेगात जाताना आढळला. त्यास आडवून तपासणी केली असता त्यात २५ हजार रू. किंमतीची अडीच ब्रास वाळू सापडली आहे. या प्रकरणी ट्रकचालकाविरूध्द गुन्हा दाखल केला असून पाच लाख किंमतीचा ट्रक व २५ हजाराची वाळू जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

## जमीन का घेतली या कारणावरून

# सालसे येथे आठ जणांकडून एकास बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.) : जमीन का घेतली या कारणावरून आठ जणांकडून एकास काठी, हॉकी स्टीक, वायरने मारहाण केली तसेच मोटारसायकलवर दगडफेक व दुकानची मोडतोड केली आहे. हा प्रकार ९ जानेवारीला सकाळी नऊच्या सुमारास सालसे येथे घडला आहे. या प्रकरणी धनाजी नामदेव येवले (रा.सालसे) किराणा दुकानदार यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ९ जानेवारीला सकाळी माझा भाऊ शहाजी याने किराणा दुकान उघडले. त्यावेळी मी व गावातील बाळकृष्ण घाडगे किराणा मालाच्या दुकानावर होतो. बाळकृष्ण घाडगे किराणा घेण्यास आले होते. त्यावेळी दशरथ घाडगे, गौरव घाडगे, सुभाष घाडगे, भारत बोकडे, दिनेश लोकरे, सूरज सालगुडे, दशरथ पवार , शुभम रूपनवर हे लोक अचानक दुकानावरती चारचाकी गाडीत आले. हातात हॉकी स्टीक, वायर, दगड, तलवारी सारख्या दिसणाऱ्या वस्तूने दुकानात येऊन तोडफोड करण्यास सुरूवात केली. तर दशरथ घाडगे व भारत लोकरे यांनी तू पुतण्याची जमीन का घेतली व या जमिनीत यायचे नाही असे म्हणून हॉकीस्टीकने पाठीत मारले व भारत लोकरे यांनी तलवारीने माझ्या डोक्यात मारले. त्याचवेळी गौरव घाडगे, सुभाष घाडगे, सूरज सालगुडे यांनी माझा भाऊ शहाजी येवले यास हॉकी स्टीकने जबरदस्त मारहाण करून गंभीर जखमी केले. त्याचवेळी बाळकृष्ण घाडगे, दिनेश लोकरे, शुभम रूपनवर, दशरथ पवार यांनी मला मारहाण करत दगड उचलून बुलेटच्या टाकीवर मारून नुकसान केले. काठीने दुकानाच्या काऊंटरवर मारून काच फोडली. या सर्वांनी तुम्हाला येथे राहू देणार नाही व जमीन वहिवाट देणार नाही अशी धमकी दिली. त्यानंतर निघून गेले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

# ट्रॅक्टरने मोटारसायकलला दिलेल्या धडकेत मोटारसायकलस्वार जखमी

करमाळा(सं.प्र.) : ट्रॅक्टरने मोटारसायकलला पाठीमागून धडक देऊन झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील धनराज कांबळे यांच्या पायाचे हाड फॅक्चर होऊन जखमी झाले आहेत. हा अपघात ४ जानेवारीला सायंकाळी सव्वासात वाजता संगोबा रोडवर घडला आहे. या प्रकरणी राजश्री धनराज कांबळे (रा.संगोबा रोड, करमाळा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझे पती हे करमाळा शहरातील कॉम्प्युटर सेंटरमधून काम संपवून घराकडे येत असताना ४ जानेवारीला सायंकाळी सव्वासात वाजता पाठीमागून ट्रॅक्टरने धडक दिली. त्यात ते खाली पडले व त्यांच्या उजव्या पायावरून ट्रॅक्टरचे चाक गेले. दवाखान्यात नेले असता उजव्या पायाच्या घोट्यामधील ज्वाइंटवर फॅक्चर झाले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस शिपाई प्रशांत गायकवाड हे करत आहेत.

शिवश्री क्लिनिक
डे केअर सेंटर
डॉ.आशुतोष पोपट कापले
B.H.M.S.(M.U.H.S.) Nasik
जनरल फिजीशियन अॅन्ड होमिओपॅथिक कन्सल्टन्सी
मो.9860982072
उपलब्ध सुविधा...
• अॅडमिट करण्याची सुविधा.
• ई.सी.जी. सुविधा
• बालरूग्णांसाठी वाफेची सुविधा
२४ तास अत्यावश्यक सुविधा
• वेळ : सकाळी ११ ते रात्री १०
आमची वैशिष्ट्ये....
• सर्व आजारांवर अॅलोपॅथिक, होमिओपॅथिक उपचार.
• मुळव्याध, त्वचा विकार उपचार.
• मानसिक आजारांवर उपचार.
• नपुसंगतेवरील उपचार.
• आहारासंबंधी योग्य मार्गदर्शन.
• मशीनव्दारे रक्तातील शुगर(BSL) व Blood Precesure तपासणी व उपचार.
• जुनाट मधुमेहातील जखम व संधिवात विकारांवर उपचार
टीप भारतीय सैन्य दलातील जवानांची तपासणी फी घेतली जाणार नाही.
अहमदनगर येथील प्रसिध्द किडनीविकार तज्ञ
डॉ.आनंद काशिद (मुत्रविकार तज्ञ, लैंगिक विकार तज्ञ व किडनी ट्रान्सप्लान्ट सर्जन)
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी, करमाळा येथे
ओपीडी वेळ सकाळी १० ते १.००
पत्ता : सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.

प्रोप्रा : सुर्यकांत कदम करमाळा तालुक्यात प्रथमच
मो.9623138222
9623849468

माऊली
रोलींग शटर्स & मटेरियल सप्लायर्स

होलसेल दरात शटरचे सर्व मटेरियल व शटरची कामे तसेच फॅब्रीकेशनची कामे करून मिळतील.

M.S.डिझाईनचे होलसेल विक्रेते
तयार शटर 100 रू. किलोप्रमाणे मिळेल.

श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत, मौलालीमाळ, जेऊर रोड, करमाळा.


भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष व आमचे आधारस्तंभ
मा.श्री.गणेश(भाऊ) चिवटे
यांची सोलापूर जिल्हा नियोजन समिती (DPDC)
सदस्य पदी निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन
श्री.जयंत काळे-पाटील
श्री.लक्ष्मण काळे
शुभेच्छुक
जे.के.इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड फर्निचर
दत्तपेठ, करमाळा., जि.सोलापूर


वाशिंबेकर
सराफ अ‍ॅन्ड सन्स
*नियम व अटी लागू
पैंजणोत्सव
पैंजण आणि जोडवींच्या घडणावळीवर
10% सुट
सुनिल तुकाराम वाशिंबेकर ९४२१०६२८६२ शेखर सुनिल वाशिंबेकर ८४५९००३४२८
सुभाष चौक, डॉ. पुंडे हॉस्पीटल शेजारी, राशिन पेठ, करमाळा, जि.सोलापूर - ४१३२०३
HAPPY
Makar
Sankranti